'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# पर्यावरणविषयक मुद्दा

**प्रा.डॉ.काकासाहेब गं. पोकळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा,
ता.जि.बीड.

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासुन मानव निसर्गावर अवलंबून राहिलेला आहे. मानवाची, जीवसृष्टीची निर्मिती ही निसर्गतः झालेली आहे. इतिहास काळापासून मानव निसर्गावर अवलंबून राहिल्यामुळे आदीमानव हे निसर्गाला आपले दैवत मानत होते. त्यामुळे ते निसर्गचक्रात फारसा बदल करत नसत. ते निसर्गाशी एकरुप राहत होते. परंतु आजच्या विलासी जगणाऱ्या मानवाने बऱ्याच ठिकाणी निसर्गावर मात केली आहे. याचा परिणाम म्हणजे प्रदुषण होय. पृथ्वीवरील जैविक विविधतेचा ऱ्हास म्हणजे निसर्गाच्या अनंत काळापासून चालणाऱ्या निसर्गचक्रावर अघात होय. या सर्व पार्श्र्वभुमीवर सर्व स्तरावर यापुढे वातावरणात प्रदुषण वाढणार नाही, पर्यावरण नियमीत संतुलीत राहील याची कटाक्षाने काळजी घेतली पाहिजे. काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संतुलन राखण्याचे पवीत्र काम केले पाहिजे.

प्रसिद्ध संशोधक, शास्त्रज्ञ व विचारवंत, कवी संगन यांनी म्हटले आहे की, जे काही घडले आहे ते सर्व आपण मानवानेच घडवून आणले आहे. हे घडण्यामागे कोणाच्या किती चुका आहेत हे शोधत न बसता अखील मानव जातीने एकत्र येऊन ठोस पाऊले उचलण्याची गरज आहे आणि त्यातच सर्व मानव जातीचे हित आहे. अजुनही वेळ गेलेली नाही. ज्ञानेश्वरांच्या विचाराप्रमाणे विश्वची माझे घर मानून मानवाने प्रयत्न केल्यास विजय मिळवीता येईल आणि निसर्गाचा अनमोल ठेवा पुढील पिढयांसाठी निश्चीतच सुरक्षित ठेवता येईल. आपले जीवन आपल्या सभोवताली असलेल्या पर्यावरणावर अवलंबून असल्यामुळे आपल्या पर्यावरणाचे संरक्षण करणे अत्यंत महत्वाचे आणि गरजेचे आहे. माणसाने वने तोडली आणि त्या ठिकाणी आता सिमेंट कॉंक्रीटची जंगले निर्माण केली. वने तोडल्यामुळे आपणाला आता पशुपक्षाचा आवाज कानावर येणे पडणे दुर्मिळ झाले आहे. वने नष्ट झाल्यामुळे वनातील जनावरे आता मानवी वस्तीत घुसत आहेत. शेतातील उसासारख्या पिकात वाघासारखे प्राणी आपले वास्तव्य करत आहेत. डोंगरातील वनराई नष्ट झाल्यामुळे वनातील ओषधी वनस्पती पर्यायाने नष्ट झाल्या आहेत. आयुर्वेद हे पुर्णपणे निसर्गावर अवलंबुन आहे. आयुर्वेद म्हटले की आपल्याला आयुर्वेदाची औषधे हे पुर्णपणे झाडपाल्याची असतात याची जाणीव होते. कडुलिंब, पिंपळ, वड, उंबर, तुळस, रुई ही झाडे, तसेच या वनस्पतीवर उंच वाढणायऱ्या जाड पाण्याच्या वेली पाणी साठुन ठेवतात हे वृक्ष वातावरण शुद्ध ठेवतात. गुळवेल सारख्या वेली पाणी ओढुन आणतात. आज भारत सुफलाम राहिलेला नाही. जमीन, पाणी, हवा यांचे संतुलन बिघडलेले आहे. वने नष्ट झाल्यामुळे जमिनीची धुप होत आहे. कधी जास्त प्रमाणात अतिवृष्टी होते. तेव्हा डोंगर माथ्यावरील पाणी वाहून जाते आणि झाडी नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाच्या पाण्याला कसलाच अडथळा येत नाही. त्यामुळे जमीन निश्चितपणे वाहुन जाते जमिनीतील माती गाळाच्या रुपाने वाहून जाते आणि मागे वाळवंट निर्माण होतात. जमिनीत झाडे नसल्याने मुळे जमीनीत पाणी मुरवण्याची प्रक्रिया पुर्णपणे बंद पडली आहे.

वातावरणात विषारी वायुचे प्रमाण वाढल्याने जागतिक तापमान वाढ झाली आहे. शोषणाची किमया झाडेच करु शकतात. नैसर्गिक संपत्तीचा गैरवापर यामुळे पृथ्वी प्रदुषीत झाली आहे. मानवाने पावसाचे पाणी आडवून-जिरवून शेताचे नंदनवन फुलविले पाहिजे आणि प्राणीमात्रांचे अस्तित्व टिकवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

1. हवेची गुणवत्ता सुधारणे व टिकून ठेवणे.
2. पाण्याचा अपव्यय थांबविणे व गुणवत्ता टिकवणे.
3. जमिनीची धुप थांबविणे व गुणवत्ता टिकवणे.
4. ध्वनी प्रदुषण नियंत्रणात ठेवणे.
5. आण्विक अपघात व इतर अरिष्ठे कमी करणे.
6. पृथ्वीवरचे वाढते तापमान कमी करणे.
7. निसर्गाच्या ऱ्हासाला आळा घालणे. पर्यावरणाचा समतोल राखणे.
8. पर्यावरणाची संकल्पना समजून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

शोध निबंधासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे. या शोधनिबंधासाठी ग्रंथ, मासिके आणि दैनंदीन अनुभव या माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**पर्यावरण म्हणजे काय ?**

सर्व साधारणपणे पर्यावरण म्हणजे सभोवतालची परिस्थिती असे तरी उत्पत्तीशास्त्राच्या दृष्टीने, पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली भोवतालची परिस्थिती होय. खरं म्हणजे पर्यावरण हा भुगोल विषयाचा मुख्य गाभा आहे. तर पर्यावरण शास्त्रात मानवी व त्यांचे पर्यावरण यांच्या संबंधाचा अभ्यास होतो. पर्यावरण शास्त्राचा सखोल आणि अर्थपुर्ण अभ्यास व्हावा यासाठी वैज्ञानिकांनी पर्यावरण शास्त्राच्या वेगवेगळया व्याख्या दिलया ओहत. त्यापुढीलप्रमाणे पाहु.

1. हर्सकोव्हीटस एन.जे. :-पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील सर्व बाह्य परिस्थितीचे आणि प्रभावाचे एकत्रीकरण आहे. जे पृथ्वीच्या पृष्ठभागावर सजीवांच्या विकासचक्राला प्रभावित करत असते.
2. जॉनसन अर्क :-पर्यावरण शास्त्र म्हणजे पृथ्वींवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास.
3. पार्क सी :- विशिष्ट ठिकाणी मानवाला ठेवणारी जी नैसर्गिक किंवा सांस्कृतीक परिस्थितीची एकात्मीक अवस्था असते तीलाच पर्यावरण असे म्हणतात.

सर्वसाधारणपणे पर्यावरण म्हणजे निसर्ग, त्यामुळे पर्यावरण ही प्राकृतीक जैवीक संकल्पना आहे. ज्यामध्ये पृथ्वीवरील जैवीक घटकाचे अस्तित्व निसर्ग नियमानुसार संतुलीत परिस्थितीवर अवलंबुन असतो. मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणात प्रदुषा, नागरीकरण, उर्जादाय वृक्षतोड, अवर्षण, ओझोन क्षय इ. सारख्या भयानक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**पर्यावरणाचे महत्व :-**

जगामध्ये पर्यावरणाचा अभ्यास फार पुर्वीपासून केला जातो. पर्यावरणशास्त्र विषयाला अलीकडच्या काळात विशेष महत्व प्राप्त झाले आहे. इ.स. 1972 साली स्टॉक होम येथील जागतिक परिषदेनंतर विकसनशील देशात पर्यावरणाच्या समस्येकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात झाली. कोणत्याही विकासाच्या योजना एखाद्या प्रदेशात आमलता आणत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे अतिशय गरजेचे आहे याची जाणीव समाज व शासन यांना मोठया प्रमाणात होत आहे आणि यासाठी या विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यांस ही काळाची गरज आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इ.स. 1960 साली पर्यावरणशास्त्र हा विषय स्वतंत्र उदयास आला. औद्योगिक क्रांती, हरीत क्रांती झाल्यानंतर

ा त्या क्षेत्रात नवीन शोध लागले दुसऱ्या महायुद्धाचे गंभीर परिणाम जपानमधील हिरोशीमा आणि नागासाकी या हरांनी भोगले, अनुबॉम्बचे संहारक गंभीर परिणाम जगाने अनुभवले आणि तेंव्हापासून लोक पर्यावरण शास्त्राविषयी ाणवी ठेवून अभ्यास करु लागले.

**र्यावरणाचे विषयी जनजागृती :-**

आपल्या देशात शासकीय पातळीवर पर्यावरण विषयक धोरणे निश्चित केली जातात. ही धोरणे राबविण्याचा त्न केला जातो. पर्यावरणाची निगा राखणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे म्हणुन पर्यावरणासंबंधी जनजागृती करण्यासाठी विेगळया माध्यमाची मदत घेतली आहे. उदा. आकाशवाणी दुरदर्शन वर्तमानपत्रे चलचित्रे यांचे द्वारा पर्यावरण क्षणाची जाणीव जनसामान्यापर्यंत निर्माण केली जाते. पर्यावरणविषयक अभ्यास प्राथमिक माध्यमिक, महाविद्यालयीन रावर समाविष्ट केला गेला आणि जुन 2005 पासून महाराष्ट्र सरकारने हा विषय शालेय स्तरावर सर्वांना सक्तीचापण ना. या खेरीज सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानुसार विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालय स्तरावर प्रथम ीसाठी सर्व शाखांना सन 2004 पासुन अनिवार्य केला आहे. या सर्वांमुळे पर्यावरण विषयक जाणिव समाजात निर्माण े.

पर्यावरणविषयक जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक अभ्यास सहली, गटचर्चा, कृतीसत्रे, परिसंवाद, अधिवेशने र्शने असे उपक्रम राबवणे गरजेचे आहे. पर्यावरण संरक्षण व संवर्धन ही चळवळ जनसामान्याची आहे आणि आज ती ळाची गरज आहे.

**जागृतीच्या पद्धती :-**

र्यावरण जनजागृती विविध उपक्रमातून करता येते.

1. शालेय स्तरावर, महाविद्यालयीन आणि समाजाच्या सर्वस्तरावर पर्यावरण शिक्षण सक्तीचे करणे.
2. पर्यावरण संबंधीत जनजागृतीत सार्वजनीक, सरकारी व निमसरकारी संस्थाचा सक्रीय सहभाग व मार्गदर्शनाची गरज.
3. शाळा महाविद्यालयामध्ये, प्रदर्शन, चर्चासत्रे, व्याख्याने, पर्यावरण ध्वनीफीत चित्रपट यांचे आयोजन करणे.
4. सामाजिक चळवळीतून जनजागृती करणे.
5. आकाशवाणी, दुरदर्शन, वर्तमानपत्रे यामार्फत जनजागृती करणे.
6. पर्यावरण समस्या क्षेत्रात शैक्षणिक सहलीचे आयोजन करणे.
7. जागतिक पर्यावरण दिन, वसुंधरा दिन, वन्यजीव सप्ताह इ. साजरे करणे.
8. झाडे लावा झाडे जगवा यासारखी मोहीम हाती घेणे.

वरील उपक्रम राबवल्यास जनजागृती होण्यास मोठी मदत होऊ शकते आणि पर्यावरणाचे रक्षण घेण्यात मदत त.

**वरण संरक्षण - आणि पर्यावरण संरक्षण विषयक कायदे-**

मानवाच्या संपुर्ण गरजा निसर्गावर अवलंबुन आहेत. त्या मानवी गरजा भागविण्यांसाठी मानव निसर्गावर घाला त असतो. मानव स्वत: नैसर्गिक संपत्तीचा आपले जीवन जगण्यासाठी उपयोग करुन घेत आला आहे. ज्यावेळी व नैसर्गिक संपत्तीचे आपल्या स्वत:च्या हितासाठी नुकसान करतो. परिणामी पर्यावरणाचा ऱ्हास करतो. रणाच्या ऱ्हासाची जी मुख्य कारणे आहेत ती सर्व मानव निर्मीत आहेत. उदा. वृक्षतोड, प्राणीहत्या, प्रदुषण व वाढती संख्या, त्यामुळे मानवाशी संबंधीत असणाऱ्या संरक्षण करण्यासाठी पर्यावरण संरक्षण विषयक कायदे करण्यात आहेत.

ISSN : 2348-7143
October-2019

**पर्यावरण संरक्षण विषयक कायदे :-**

पर्यावरण संरक्षण विषयक कायदे पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. वन्यजीव संरक्षण अधिनियम कायदा 1972.
2. वनसंवर्धन कायदा 1990
3. पर्यावरण रक्षण कायदा 1986
4. जलप्रदुषण नियंत्रण कायदा 1974
5. हवा प्रदुषण नियंत्रण कायदा 1981
6. ध्वनी प्रदुषण व नियंत्रण अधिनियम 2000

भारतामध्ये पर्यावरण संरक्षण संदर्भात विविध कायदे केले आहेत. परंतु मुळ प्रश्न सुटण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी प्रभावी व्हावी यासाठी एखादी मध्यवर्ती यंत्रणा असावयास हवी.

**सारांश :-**

आपल्या भारतात पर्यावरण विषयक जागृतीची मोहीम फार मोठ्या प्रमाणावर आयोजीत करावी लागेल. आपल्या देशात पर्यावरण विषयीचे धोरणे शासकीय पातळीवर ठरवली जातात आणि त्याची अंमलबजावणीही केली जाते. पर्यावरण सरंक्षणासाठी कायदेही आहेत पण या देशात प्रत्येक व्यक्तीची पर्यावरण संतुलन बाबतीत काहीतरी कर्तव्य केली पाहिजे. हे कर्तव्य म्हणजे, पर्यावरण जोपासणे, त्याची निगा राखणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहेत. म्हणून पर्यावरणासंबंधी जागृती करण्यासाठी वेगवेगळया माध्यमाची मदत घेतली पाहिजे आणि त्यातुन जनजागृती किती महत्वाची आहे हे लोकांना समजावून सांगितले पाहिजे.

थोडक्यात लोकसंख्या संतुलन राखणे, हवेची गुणवत्ता सुधारणे व टिकून ठेवणे, पाणी प्रदुषण, अपव्यय थांबवणे व गुणवत्ता टिकवणे, जमीनीचे प्रदुषण थांबवणे, जमिनीचा पोत सुधारणे, ध्वनी प्रदुषण कमी करणे पृथ्वीवरचे वाढते तापमान कमी करणे, पृथ्वीवरचे वाढते तापमान कमी करणे, वाढते शहरीकरण, जंगलतोड यावर आळा घालणे इत्यादी महत्वाच्या ऱ्हासाच्या कारणाचा अभ्यास करुन उपाय करणे योग्य होईल्.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. पर्यावरण विज्ञान, डॉ. बी.एन.पांडे, सेवानिवृत्त विद्यापीठ प्राध्यापक (पर्यावरण शास्त्र) व मानद प्राध्यापक, महात्मा गांधी मिशनचे जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद.
2. डॉ. वसंत माळी, विभाग प्रमुख (वनस्पती शास्त्र) आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा, ता.आष्टी, जि.बीड.

2019 - 20



# महात्मा गांधींच्या विचारांची समयसूचकता

प्रा.डॉ. के. जी. पोकळे_एन. एस. एस. आर. कलाआणि
विज्ञान महाविद्यालय, आसोळा, ता. जि. बीड

महात्मा गांधीच्या विचाराने अखिल मानव जातीचे कल्याण घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा गांधीच्या विचारांमधील अहिंसा, सत्याग्रह आणि विश्वस्ताबाबातचे विचार आजही महत्त्वपूर्ण स्वरूपाचे आहेत. आजही विश्वाला त्यांच्या विचारांची गरज असल्याचे दिसते म्हणूनच जगात सर्वत्र महात्मा गांधींची जयंती अहिंसा दिन म्हणून साजरी केली जात आहे.?

अहिंसा :—

महात्मा गांधींनी सांगितलेला अहिंसेचा विचार त्रिकालबाधित सत्य आहे. ''महात्मा गांधी म्हणतात, अहिंसा हा सत्याचा आत्मा आहे, कारण सत्याच्या आत्म्यातूनच अहिंसेचा आविष्कार होतो. अहिंसा आणि सत्य यांना वेगळे केलेच जाऊ शकत नाही कारण हिंसा असत्य असते, विनाशकारी असते हिंसा म्हणजे क्रोध, स्वार्थ, वासना आदी प्रवृत्तींना प्रोत्साहन होय. म्हणून अहिंसा म्हणजे सर्वा प्रती प्रेम असणे, हिंसेपासून पूर्णत: मुक्ती मिळवणे होय. गांधी म्हणतात, या विश्वातील व्यवहार अहिंसेच्या माध्यमातून केले जाऊ शकतात कारण अहिंसेतून प्रेमाची निर्मिती केली जाऊ शकते. प्रेमावरच जगाचे व्यवहार चालतात म्हणून अहिंसा सर्वव्यापी सर्वकालीननियमअसूनजीवनाच्याप्रत्येक घटकावरत्याचापरिणामहोतअसतो.''[१]

महात्मा गांधींनी हिंसेने तीन प्रकार सांगितलेले आहेत.

१) विधायक अहिंसा
२) निषेधात्मक अहिंसा
३) नैतिक अहिंसा

नैतिक अहिंसेचेही महात्मा गांधीनी तीन प्रकार अ) विर पुरूषाची अहिंसा ब) दुर्बल व्यक्तिची अहिंसा ब) भित्र्या व्यक्तीची अहिंसा. महात्मा गांधी यापैकी वीरपुरूषाच्या अहिंसेला महत्त्व देतात. कारण वीर पुरूषामध्ये हिंसा करण्याची शक्ती असते परंतु तो हिंसा हे तत्त्व म्हणून पाळतो मात्र दुर्बल व्यक्ती व भित्री व्यक्ती यांची अहिंसा महात्मा गांधींना उचित वाटत नाही. महात्मा गांधी भित्र्या व्यक्तीने स्विकारलेल्या अहिंसे पेक्षा हिंसेला महत्त्व देतात.

२) सत्याग्रह :—

महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाबाबतही विचार मांडलेले आहेत. महात्मा गांधींच्या मते ''सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह. सत्याच्या प्राप्तीसाठी केलेली तपश्चर्या होय. सत्याच्या प्राप्तीसाठी अहिंसात्मक मार्गाने केलेला प्रयत्न म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रहात स्वत: कष्ट करून सत्याचे संरक्षण करणे आणि करवून घेणे म्हणजे सत्याग्रह. अन्याय आणि पिळवणुकीसाठी आत्मिक शक्तीच्या जोरावर केलेला प्रतिकार अशी सत्याग्रहाची व्याख्या महात्मा गांधी करतात. म्हणजे सत्याग्रहातही महात्मा गांधींना सत्य, अहिंसा आणि आत्मिक शक्तिचा विकास अपेक्षित आहे. तत्त्व म्हणून सत्याग्रहाचा वापर केला जात नाही, तर तत्त्वाबरोबरच सत्याग्रह हा एक व्यावहारिक कार्यक्रम आहे.''[२] आणि तो आजच्या काळातही सुसंगत स्वरूपाचा असल्याचे दिसते.

महात्मा गांधींनी सत्याग्रहाची पुढील साधने तथा मार्ग सांगितलेले आहेत.

१) असहकार
२) सविनय कायदेभंग
३) हिजरत
४) उपोषण
५) हरताळ
६) धरणे.

इ. मार्गाने महात्मा गांधींना सत्याग्रह अभिप्रेत आहे.

ISSN 2277-8063

विश्वस्त संकल्पना :—

महात्मा गांधींनी मांडलेल्या विचारांमध्ये विश्वस्थाची संकल्पना तथा विचार अत्यंत महत्त्वपूर्ण स्वरूपाचा वाटतो. "विश्वस्त कल्पना हा गांधींच्या रामराज्याचा दुसरा घटक आहे. हा एक नाविण्यपुर्ण असा आर्थिक विचार आहे. विश्वस्थ कल्पनेच्या माध्यमातून गांधींनी श्रम आणि भांडवल यांचा संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातील सर्वसामान्य व्यवस्था भांडवलशाही तत्त्वावर आधारलेली असते. भांडवलशाहीत निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे समता निर्माण करण्यासाठी भांडवलशाही व भांडवलदारांच्या नाशाचा विचार पुढे येतो. गांधींनी यावर सूचविलेला उपाय म्हणजेच विश्वस्त कल्पना होय. गांधीजी म्हणतात, ज्याच्या जवळ गरजेपेक्षा अधिक संपत्ती आहे, अशांनी गरजेपेक्षा अधिक असलेली संपत्ती आपली न मानता समाजाची समजून त्याचे विश्वस्थ म्हणून समाजासाठी उपलब्ध करून द्यावी."[३] संपत्ती कुणाकडून जबरदस्तीने न घेता व्यक्तीच्या मनात आपण या संपत्तीचे मालक नसून तिचे विश्वस्थ आहोत अशी भावना व्यक्तीमध्ये निर्माण करून श्रीमंताची संपत्ती आवश्यक त्यांचेसाठी वापरून आर्थिक समता प्रस्तापित करण्याचा प्रयत्न महात्मा गांधींनी केलेला आहे. आर्थिक समता प्रस्तापित करणेही सुध्दा काळाची गरज आहे.

महात्मा गांधींनी विश्वस्थांच्या संकल्पनेच्या माध्यमातून संघर्ष टाळून आर्थिक समता प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महात्मा गांधींनी मांडलेल्या विचारांपैकी अहिंसा, सत्याग्रह व विश्वस्थाबाबतचे विचार आजच्या काळासाठी सुध्दा पुरेपुर आवश्यक असून तंतोतंत लागू पडतात.

निष्कर्ष :—

महात्मा गांधींचा अहिंसेचा विचार आजच्याकाळात सुध्दा अखिल मानवीकल्याणाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा दिसून येतो.

महात्मा गांधींचा सत्याग्रहाचा विचार हासुध्दा आधुनिक काळात अन्याय करणाऱ्या व्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठीचे महत्त्वपुर्ण शस्त्र असल्याचे दिसते.

विश्वस्ताची संकल्पना ही आधुनिक काळाला तंतोतंत लागू पडेल अशी कल्पना आहे. रक्तरंजितक्रांती न होऊ देता समाजामध्ये आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न महात्मा गांधींनी केलेला आहे.

अहिंसा, सत्याग्रह व विश्वस्त हे महात्मा गांधींचे विचार अखिल विश्व व मानवी कल्याणासाठी कालही महत्त्वपुर्ण होते, आजही महत्त्वाचे आहेत, आणि भविष्यातही महत्त्वाचे असतील.

संदर्भ :—

१) भारतीय राजकीय विचार, प्रा. किसन चोपडे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती—सप्टेंबर २००२, पृष्ठ क्र. ११७.
२) उपरोक्त, पृष्ठ क्र. ११९ ते १२०
३) उपरोक्त, पृष्ठ क्र. १२६ ते १२७

2019 - 20

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

February 2020
Special Issue-01



13

# शाहू महाराजांचे कृषी विषयक कार्याचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

**प्रा.डॉ. काकासाहेब पोकळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**********

**प्रास्ताविक :-**

राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. राजगादीवर बसलेले असताना सर्वसामान्य जनतेला मायेची पांघर घालणारे ते शाहू महाराज तसेच मानवाच्या मानवतेवर लोकोत्तर प्रेम करणारे राजे म्हणून त्यांची संपूर्ण जगाला ओळख आहे हे मात्र खरे.

महाराष्ट्रातील संस्थानिकांमध्ये दोन संस्थानिकांची नावे आदराने घेतली जातात. त्यातील एक संस्थानिक म्हणजे कोल्हापूरचे शाहू महाराज होय. गादीवर बसल्यानंतर महाराजांनी सर्वप्रथम नोकरशाहीवर नियंत्रण मिळवून प्रशासनातील आनागोंदी समाप्त केली. पुढे संस्थानाच्या आर्थिक विकासाला वाव देण्यासाठी शेती, उद्योग, दुष्काळ निवारण, आर्थिक गुंतवणूकीवर भर देण्यास सुरुवात केली होती. त्यांनी शेती उद्योग, दुष्काळ निवारण आदी क्षेत्रात १८९४ ते १९२२ च्या दरम्यान असाधारण वाढ केलेली दिसते.

**संशोधन पद्धती :-**

ज्ञानाची प्रत्येक शाखा आपल्या विशिष्ट विषयाचे अध्ययन करते. ज्ञान संपादन करण्याच्या प्रक्रियेत आणि त्यांच्या वास्तविक व्यावहारिक कृतीमध्ये लोक आपली विशिष्ट ध्येये निश्चित करतात. प्रस्तुत संशोधनाकरिता आवश्यक संशोधन पद्धती निश्चित करुन तिचा योग्यप्रकारे अवलंब करुन प्रस्तुत संशोधन पेपर पूर्ण केला आहे.

**संशोधनाचा उद्देश :-**

शाहू महाराजांचे कृषी विषयक कार्याचे योगदान हा अभ्यास करण्यामागील हेतू व उद्देश असा राहिल.

१. कृषी धोरणाचा चिकित्सक अभ्यास करणे.
२. कृषी विकासातील शाहू महाराजांचे योगदान.
३. कृषीधोरणाचा नव्याने आढावा घेणे.
४. राजर्षी शाहू यांचे कृषीविषयक विचार, त्यांची जडणघडण व त्यांचा एकूणच कृषी क्षेत्रात पडलेला प्रभाव यांचा शोध घेणे.

**गृहितके :-**

संशोधन पेपरचे मूळ शीर्षक, व्याप्ती आणि अभ्यासाचा हेतू लक्षात घेऊन अभ्यासाची गृहितकृत्ये निश्चित केली. त्या अनुषंगाने कृषी विषयक कार्याचे योगदान व विकास याला शाहू महाराज कसे कारणीभूत आहेत हे स्पष्ट होते.

**जीवन परिचय :-**

छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी कागल येथे घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव परंतु सन १८८४ मध्ये कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी महाराजांच्या पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे यांच्या जेष्ठ पुत्रास, यशवंतरावांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले. पुढे यशवंतराव हे शाहू महाराज या नावाने रयतेस परिचित झाले.

राजकोट येथे सन १८८५ साली राजपुत्रांसाठी असलेल्या महाविद्यालयातून शाहूंनी शिक्षण पूर्ण केले. १८८५-१८८९ या काळात प्रिन्सिपल मॅकनॉटक यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. त्यांनी सन १८९० ते १८९४ या काळात धारवाड येथे एस.एम. क्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी भाषाज्ञान राज्यकारभाराविषयक व जागाच्या इतिहासाबद्दल ज्ञान संपादन केले.

राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूरची अधिकार सूत्रे हाती घेतली. तसेच त्यांनी तत्कालीन समाज व्यवस्थेला व ब्रिटिश शासनकर्त्याला शासन कारभारांचा त्यांनी अत्यंत गहन अभ्यास केलेला होता हे मात्र खरे. कारण ब्रिटिशांची संस्थानाबाबतची धोरणे ही सर्वसामान्य जनतेस न मानणारी होती. पुढे यासाठी शाहू महाराजांनी सहकार्य प्रस्थापून बहुजन समाजाचा सर्वांगिण विकास करावयाचा हे धोरण स्विकारले. कारण याच काळात समाजात जातीयता, वर्ग विषमता, अज्ञान तसेच कर्मकांड, अंधश्रद्धा यांचा पगडा राहिला होता. यामुळे समाजाची आर्थिक, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक प्रगती झाली नाही हे मात्र खरे.

**कृषी विकास व राजर्षी शाहू महाराज :-**

हिंदूस्थान हा मुख्यत्त्वेकरुन शेतकऱ्यांचा देश आहे. या देशातील बहुसंख्य प्रजेचा मुख्य धंदा शेती हा राहिला आहे. या करीता देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे त्यांनी प्रथमतः आपल्या शेतीच्या सुधारणेकडे अवश्य लक्ष दिले पाहिजे, हे सर्व राजर्षी शाहू महाराजांना ज्ञात होते असे मला वाटते.

समाजाचा खरा विकास हा आर्थिक घटकांवर अवलंबून असल्याने शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी उपाय योजना केल्या होत्या. आज मात्र शेतकऱ्यांना बियाणे आणि खत मिळविण्यासाठी काय काय करावे लागते हे सर्व महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील जनतेला ज्ञात आहे, हे मात्र खरे.

**आर्थिक सुधारणा :-**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सन १९९७ मध्ये शेतकऱ्यांना भीषण दुष्काळात तोंड द्यावे लागल्याने, जनावरांच्या चारापाण्यासाठी व्यवस्था केली होती. शेतकऱ्यांना कर्जे देऊ केली. तसेच त्यांचा शेतसारा माफ केला तर सावकारांच्या ताब्यातून शेतकऱ्यांच्या जमिनी सोडवून शेतीच्या विकासासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य केले होते.

राजर्षी शाहू महाराज अर्थशास्त्रज्ञ नव्हते, परंतु त्यांना आर्थिक समस्यांबद्दल निश्चित कल्पना होती. आर्थिक विकासावरील त्यांच्या कल्पना या आज देखील अमूल्य आहेत. उदा. दारिद्र्य, बेरोजगारी, अवर्षण, आवश्यक मालाचा तुटवडा, जलसंधारण, शेती उत्पादन वाढविण्याच्या नव्या योजना या सारख्या समस्या आजदेखील राजर्षी शाहूंच्या काळाप्रमाणेच गंभीर आहेत, हे विसरता येत नाही.

शेतीच्या उद्योगात जितक्या अधिक लोकांना नेहमी काम मिळेल तितके चांगले, शेतीक्षेत्रातील प्रत्येक सुधारणा ही आमच्या शेतकऱ्यांचे हित करणारी आहे. या दृष्टीने आपल्या प्रयत्नांचे अभिनंदन करतो. आपले प्रयत्न यशस्वी होण्याच्या कामी मजकडून योग्य ती मदत अवश्य मिळेल. याविषयी शंका नको, असे उद्‌गार त्यांनी काढलेले आहेत. आजपासून जवळ-जवळ १०६ वर्षापूर्वी कोल्हापूर येथील आर्य क्षेत्रीय परिषदेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना स्वतः राजर्षीनी !

वरील विधानाचा विचार केला असता आपल्याला असे लक्षात येते की, आजची शेतीविषयक देशाची परिस्थिती व राजर्षींच्या कारकिर्दीतील हिंदूस्थानची शेतीविषयक परिस्थिती यामध्ये मोठ्या प्रमाणात साम्य आहे. यातील वैशिष्ट्ये एवढेच आहे की, राजर्षीनी मांडलेला हा विचार एका शतकापूर्वीचा होता व तो आजसुद्धा लागू होत आहे, हे अलिकडच्या शेती धोरणात व्यक्त होते. यातूनच राजर्षींची गरुडा सारखी असणारी दूरदृष्टी दिसून येते.

**आधुनिक शेती पद्धतीत प्रयोगशिलता :-**

राजर्षींनी शेतीचे महत्त्व ओळखून त्यांनी संस्थानात शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी कृषी, उद्योगधंदे, व्यापार आणि व्यवसाय, वाहतूक इ. विविध क्षेत्रातील विकास आपण कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये पाहिला असता त्यांची मूळे राजर्षी शाहूंच्या प्रगतीशिल विचारांमध्ये आलेत हे दिसून येते.

शेती प्रयोगशिलता व प्रदर्शन राजर्षीनी संस्थानात शेती लागवडीचे विविध प्रयोग केले आणि त्यांच्या या प्रयोगाला लहान मोठ्या प्रमाणात यश देखील आले. शेतजमिनीतून चहा, कॉफी तसेच तृतीची लागवड करण्यास सुरुवात केली. तसेच पिकांची प्रदर्शने, प्राण्यांसाठी अभयारण्ये शेतीविषयक प्रदर्शन भरविली होती हे विसरता येत नाही.

राजर्षीनी संस्थानात १८९४-९५ व १८९५-९६ या काळात ३७ मैल कोरफडीची लागवड केली होती. टॅपिओका (साबुदाणा) लागवडीचा प्रयोग, गंजन नावाच्या गवतापासून राळ तयार करण्याचा प्रयोग, वेलदोडे लागवड, मधुमक्षिका पालन अशा प्रकारे राजर्षीनी संस्थानातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त व्हावा व पडिक जमीन लागवडीखाली यावी व शेतीविकास व्हावा या उद्देशाने हे प्रयोग केले होते हे मात्र खरे.

**सारांश :-**

एकूणच वरील सर्वच बाबींचा सारासार विचार केल्यानंतर एवढेच म्हणावेसे वाटते की, आजपासून एका शतकापूर्वी ज्या लोकराजानें कृषीधोरण कशा प्रकारे राबवावे, त्याची आखणी कशा प्रकारे करावी, याचा पाया घालून दिला होता. त्या राजाच्या त्या काळातील वैविध्यपूर्ण धोरणांची आजसुद्धा देशाच्या कृषी व्यवस्थेला गरज आहे, हे मात्र खरे.

समाजसुधारकांना ज्या गोष्टी घडवून आणण्यासाठी अनेक दशके वाट पहावी लागली असती. त्या गोष्टी महाराजांनी चुटकीसरशी सोडवून दाखविल्या. त्यांचे कार्य पाहून न.र. फाटक सारख्या, विद्वानांना त्यांच्या कार्याची तुलना इंग्लंडच्या आठव्या हेक्टरीच्या कार्याशी करण्याचा मोह झाला. यातून त्यांच्या कार्याची थोरवी व महत्त्व आपल्याला लक्षात येते हे मात्र खरे.

**संदर्भ :-**

१. प्रा. हरेल केशव - राजर्षी शाहू महाराज यांचे राजकीय विचार
२. सुर्वे डी.ए. - शाहू छत्रपती : एक विलक्षण व्यक्ती
३. सौ. जोशी स्मिता - महाराष्ट्रातील समाजसुधारक
४. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ
५. डॉ. महेंद्र पाटील - भारतीय राजकीय विचारवंत

❑❑❑